दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com RNI No.MAHMAR/2019/79184

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ७४ वा ▶ गुरुवार दि.१८ जानेवारी २०२४ ▶ किंमत :२ रु. ▶ पृष्ठे : ६

खुशखबर... खुशखबर...

खास लोकांच्या आग्रहास्तव

न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स, धुळे

पार्सल सेवा व रिटर्न बुकींग उपलब्ध

धुळे ते नागपुर, अमरावती, अकोला

स्लिपर कोच २X१ नॉन एसी बस

रात्री १०.३० वाजेला



संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896

दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

## न्यूज कॉलम

### छेड काढून सोशल मीडियावर बदनामी

**धुळे ।** तालुक्यातील न्याहळोद गावात एका विद्यार्थीनीची गेल्या चार महिन्यांपासून छेड काढणार्या तरूणावर सोनगीर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.खेमराज ऊर्फ पुन्या विजय पाटील रा.न्याहळोद हा गेल्या चार महिन्यांपासून शाळेत जाताना पाठलाग करायचा व जवळीक साधून पळवून नेण्याची धमकी द्यायचा. इतकेच नव्हे तर त्याने सोशल मीडियावर नावाचे स्टेटस ठेवुन बदनामी केली. तसेच आई-वडिलांच्या मोबाईलवर हाय मॅसेज पाठवुन जवळीक साधण्याचा प्रयत्नही केला. या फिर्यादीवरून गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. तपास असई विजय पाटील करीत आहेत.

### नाशिक रोडला पुन्हा २ गाड्यांचे नुकसान

**नाशिक रोड ।** देवळाली गावात पुन्हा घराजवळ उभे असलेल्या दोन आलिशान कारच्या काचा फोडून काही समाजकंटकांनी दहशत माजविण्याचा प्रयत्न केला. यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरलेले असून, उपनगर पोलिसांनी शाश्वत उपाययोजना करावी आणि पेट्रोलिंग वाढवावे अशी मागणी होत आहे.

### प्रेयसीच्या खूनप्रकरणी आरोपीला जन्मठेप

**नाशिक ।** परप्रांतिय प्रेयसीसमवेत सिन्नरमध्ये राहत असताना, तिच्या चारित्र्यावर संशय घेत गळा आवळून खून केल्याप्रकरणातील आरोपीला मुख्य जिल्हा न्यायधीशांनी मरेपर्यंत जन्मठेप व १० हजारांच्या दंडाची शिक्षा ठोठावली आहे. २०१९ मध्ये सदरची घटना सिन्नर शहरात घडली होती. दरवेश गेंदालाल चौरे (४०, मूळ रा. भोपाळ) असे आरोपीचे नाव आहे.

# पंतप्रधान मोदींपुढे हात पसरण्याची गरज नाही : आम्ही लढून आरक्षण मिळवणार : मनोज जरांगे

**जालना । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



पंतप्रधानांकडून अपेक्षा उरली नाही, मराठ्यांनी सुद्धा आता त्यांच्याकडून अपेक्षा सोडावी असे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे. तर, पंतप्रधान मोदींसमोर हात पसरवण्याची गरज नाही, आम्ही लढून आरक्षण मिळवणार असल्याचे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी १९ जानेवारीला सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. यावर बोलतांना मनोज जरांगे म्हणाले की, पंतप्रधानांकडून अपेक्षा उरली नाही, मराठ्यांनी देखील त्यांची अपेक्षा सोडून द्यावी. त्यांचा महाराष्ट्रात येण्याचा आम्हाला काय फायदा आहे. तुम्ही सामान्यांचे नेतृत्व केलेला आहे, तुम्ही राज्य सरकारला आदेश देऊन टाका हे आम्ही त्यांना शिर्डीच्या दौऱ्यावर असतानाच आवाहन केले होते. जो सामान्यांच्या बाजूने बोलणार नाही, ज्याला सामान्यांची गरज राहिलेली नाही, त्यांच्याकडून अशा अपेक्षा करण्याची काय गरज आहे. आम्ही लढून आरक्षण मिळवतो, हात पसरवण्याची गरज नाही. एकदा आम्ही त्यांना विनंती केली होती. राज्यात एवढे वातावरण ढवळून निघाले असतांना पंतप्रधानांनी त्यात हस्तक्षेप करणे गरजेचे होते. पंतप्रधानांनी आरक्षण देऊन टाका एवढ शब्द काढणे अपेक्षित होते.मात्र, आता त्यांच्याकडून मराठ्यांनी अपेक्षा सोडली आहे. त्यामुळे ते महाराष्ट्रात येऊ की कुठेही येऊ, मराठ्यांनी त्यांची अपेक्षा सोडावी, असेही जरांगे म्हणाले आहेत.आम्ही २० जानेवारीला मुंबईला निघणारच, आम्हाला मुंबईला जाण्याची कोणतेही हौस नाही. मुंबईमध्ये सुद्धा आमचेच बांधव असून, त्यांनी होणार त्रास काही दिवस सहन करावा. विनाकारण मुंबईला त्रास देण्याचे काम सरकारच करत आहे. हे सर्व सरकार हाताने मुद्दाम करत आहे. सरकारमधील काही लोकांचा विरोध असून, ते अंधारातून विरोध करत आहेत. त्यांची नावे देखील जाहीर करणार आहोत. त्यामुळे, समाजाच्या विरोधात जाऊन पापाचे धनी होऊ नका. यांना गोरगरीब मराठ्यांची पोरं मोठी होऊ द्यायची नाहीत. त्यामुळे षडयंत्र रचले जात आहे. धोका झाला तरी भीतोय कोण?, नोटीसा देऊन काही होणार नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

**अंतरवाली ते मुंबई प्रवासातील मुक्कामाचे टप्पे**

- २० जाने सकाळी ९ वाजता अंतरवली मधून निघणार
- २० जानेवारी पहिला मुक्काम- शिरूर(बीड) मातोरी डोंगर पट्ट्यात.
- २१ जानेवारी दुसरा मुक्काम - करंजी घाट, बारा बाभळी-(अ. नगर)
- २२ जानेवारी तिसरा मुक्काम-रांजणगाव-(पुणे जिल्हा)
- २३ जानेवारी चौथा मुक्काम - खराडी बाय पास,पुणे
- २४ जानेवारी पाचवा मुक्काम- लोणावळा
- २५ जानेवारी सहावा मुक्काम - वाशी, नवी मुंबई
- २६ जानेवारी सातवा मुक्काम आझाद मैदान आंदोलनस्थळी

**सरकारला दिले मराठवाडा गॅझेट**

**१८८४ च्या हैदराबाद गॅझेटमध्ये मराठवाड्यात ४९हजार कुणबी नोंदी असल्याचा उल्लेख आहे.शिवाय यात कुठेही मराठा नोंद नाही. त्यामुळे ज्याकुणबी नोंदी आहेत ते मराठेच असून कुणबी आणिमराठे एकच आहेत, असा आणखी एक पुरावाजरांगे पाटील यांनी बच्चू कडू यांच्याकडे सादरकेला. सातारा संस्थानचे गॅझेटीयरही दिले आहे.**

**मुंबईला आरक्षण आणायला जाऊ**

**रॅली मध्ये शांतपणे यावे आणि ज्यांना स्वयंसेवक व्हायचे आहे, त्यांनी २० जानेवारीला अंतरवालीला यायचे आहे. आरक्षण मिळाले, तरी मुंबई जाणार आहोत आणि नाही मिळाले तरी मुंबईला जाणार आहोत. आरक्षण मिळाले तर गुलाल घेऊन जाऊ आणि नाही मिळाले तर आरक्षण आणायला जाऊ असं मनोज जरांगे पाटील यांनी ठणकावून सांगितलं.**

# रुग्णवाहिकेतून गोवंश जातीच्या जनावरांची तस्करी



**पोलिसांनी दोघांना घेतले ताब्यात**

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

कोणाला संशय येऊ नये या उद्देशाने रुग्णवाहिकेतून गोवंश जातीच्या जनावरांची तस्करी केली जात होती. शिरपूर तालुका पोलिसांनी म्बुलन्समधून गोवंश जातीच्या जनावरांची सुटका करत तस्करी करणाऱ्या दोघांना ताब्यात घेतले आहे. मध्यप्रदेश व महाराष्ट्राच्या बॉर्डरवर असलेल्या सेंधवा येथून शिरपूरकडे रुग्णवाहिकेतून काही गोवंश जातीची जनावरे कत्तलीच्या हेतूने अमानुषपणे कोंबून नेली जात होती. याबाबतची खात्रीलायक माहिती सूत्रांकडून शिरपूर तालुका पोलिसांना माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे शिरपूर तालुका पोलिसांनी सापळा रचला असता हाडाखेड चेक पोस्ट या ठिकाणी रुग्णवाहिकेची तपासणी केली.

सेंधव्याकडून शिरपूरच्या दिशेने एमपी. ०९ बीए ९८१ क्रमांकाच्या रूग्णवाहिकेतून गोवंश जातीच्या गायींची बेकायदेशीररित्या निर्दयतेने कत्तलीसाठी वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती सुरेश शिरसाठ यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी पथकासह हाडाखेड सीमा तपासणी नाक्याजवळ गुरूव्दारा समोर सावळा लावला. सकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास सेंधव्याकडून येणार्या एमपी ०९ बी.ए. ९८१ क्रमांकाच्या रूग्वाहिकेला थांबविले. त्यावरील चालकाने त्याचे नाव विजय प्रल्हाद चौहान व त्याचे सोबत असलेला इसमाने त्याचे विक्रम बालाराम चौहान दोघे असे सांगितले.चालकासह दोघांविरूध्द शिरपूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम उशिरापर्यंत सुरू होते. ही कारवाई पोलीस अधिक्षक श्रीकांत ढिवरे, अपर पोलीस अधिक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश शिरसाठ, असई जयराज सिताराम शिंदे, रफीक मुल्ला, कैलास जाधव, पोहेकॉ मिर्झा, पोकॉ संजय भोई यांच्या पथकाने केली.

**दहा जनावरे कोंबलेली**

**पोलिसांनी तपासणी केली असता रुग्णवाहिकेत जवळपास दहा गोवंश जातीची जनावरे अमानुषपणे बांधून व कोंबून नेले जात असल्याचे आढळून आले. या संदर्भात दोन जणांच्या मुसक्या पोलिसांनी आवळल्या असून, या कारवाईदरम्यान दहा गोवंश जातीच्या जनावरांची मुक्तता करत पोलिसांनी या गाईंना पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांतर्फे तपासणी करून गोशाळेत त्यांची रवानगी केली आहे.**

# मुंबईत काही रेडे मोकाट सुटलेत: बंदोबस्त करण्याची योजना असेल तर सांगा?

**सातारा । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

मुंबईत झालेल्या महापत्रकार परिषदेचा उल्लेख टाळून कराडमधील कृषी प्रदर्शनात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांच्यावर सडकून टीका केली. मुंबईत काही रेडे मोकाट सुटलेत. त्यांचा बंदोबस्त करण्याची योजना इथल्या कृषी प्रदर्शनात असेल तर सांगा, अशा शब्दांत फडणवीसांनी ठाकरे-राऊतांचा समाचार घेतला.

भाजपचे सातारा लोकसभा प्रभारी डॉ. अतुल भोसले यांनी आयोजित केलेल्या कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना बुधवारी देवेंद्र फडणवीसांनी जोरदार फटकेबाजी केली. नामोल्लेख टाळून उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांना फडणवीसांनी मोकाट रेडे म्हटले. तसेच इथल्या कृषी प्रदर्शनात सर्वात उंच बैल, दोन टनाचा रेडा असे बरेच काही आहे. आमच्याकडे मोकाट सुटलेल्या रेड्यांचा बंदोबस्त करण्याची काही योजना या प्रदर्शनात आहे का? असा खोचक सवाल त्यांनी केला. इंजेक्शन घेऊन टिकलेला पैलवान हा कधी टिकत नाही. खरा पैलवान हा चिरकाल टिकून राहतो. शेतीत नवीन तंत्रज्ञानाचा वापरदेखील करायला हवा. कमी वेळ आणि कमी खर्चात शेती करणे यामुळे शक्य आहे.

# कल्याणी अंपळकरांवर हल्ला करणाऱ्यांना अटक करा : आरपीआय महिला आघाडी

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



मनपाच्या माजी उपमहापौर कल्याणी अंपळकर आणि सुलोचना देवीसिंग राजपूत यांच्यावर सशस्त्र हल्ला करणाऱ्या संशयितांना त्वरित अटक करावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या महिला आघाडीने जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे केली आहे. आरपीआय महिला आघाडीच्या कार्याध्यक्षा बुद्धप्रिया धोंडीराम पगारे यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी पोलीस प्रशासनाला निवेदन दिले.

माजी उपमहापौर कल्याणी अंपळकर आणि सुलोचना राजपूत यांच्यावर १० जानेवारी रोजी सशस्त्र जमावाने हल्ला केला. लाठ्या-काठ्या आणि कोयते घेऊन भर वस्तीत हा हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात कल्याणी अंपळकर यांची सोनपोत लांबविण्यात आली. तसेच त्यांच्या वाहनाचे देखील नुकसान करण्यात आले. या घटनेमुळे दहशतीचे वातावरण आहे. माजी उपमहापौरांसारख्या उच्चपदस्थ महिलेवर भर वस्तीमध्ये हल्ला झाल्याच्या घटनेमुळे शहरातील महिलांना असुरक्षित वाटू लागले आहे. निवेदन देताना कमल संदीप शिंदे, सुशीला सोनवणे, लक्ष्मी गायकवाड, सुकू सोनवणे, कामिनी सोनवणे, शकुंतला मालचे, सुकू दावलकर, रंगू महाजन, संधू पवार, रीना पवार, वंदना सोनवणे, आशा पाटील, स्मिताली पवार या महिला उपस्थित होत्या.

# घंटागाडी कामगारांचे प्रश्न सोडवण्याबाबत कर्मचारी संघटनेचे प्रशासनाला निवेदन

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

घंटागाडी कामगारांचे प्रश्न सोडवण्याबाबत बाबत तसेच घंटागाड्यांची दुरुस्ती करण्याबाबत महाराष्ट्र नगर पालिका कामगार कर्मचारी संघटनेतर्फे धुळे मनपा प्रशासनाला निवेदन देण्यात आलं.

महानगरपालित स्वयंभू ट्रान्सपोर्ट प्रायव्हेट लिमीटेड या कंपनी मार्फत घंटागाडी कर्मचारी काम करीत आहेत. हे चालक, कचरा जमा करणारे, वाहून नेणारे कामगार आमच्या सीटू संलग्न युनियनचे सभासद आहेत. घंटागाडी व कामगारांचे प्रश्नांबाबत वेळोवेळी मनपा प्रशासन व व्यवस्थापनास दुरुस्ती तसेच कामगारांना पीएफ, ई.एस. आय.सी. गणवेश, गणबुट, हातमोजे, फावडे इत्यादी सामान दिले जात नाही. तसेच महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या किमान वेतनाची अमलबजावणी केलेली नाही. तसेच घंटागाडी वाहनांची दुरुस्ती होत नसल्यामुळे कामगारांना काम करण्यास अडचणी येत आहेत. या प्रश्नांबाबत लक्ष घालून संबंधीत ठेकेदारावर कारवाई करुन वाहनांची दुरुस्ती करण्याबाबत त्वरीत आदेश द्यावेत व सर्व कामगारांना किमान वेतन लागू करावे असे निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर कॉम्रेड एल. आर. राव, कॉम्रेड राजेंद्र चौरे यांच्या सह्या आहेत.

# छत्तीसगड राज्यातील हसदेव जंगलाची होणारी वृक्षतोड थांबवा : महाराष्ट्र प्रदेश आदिवासी कॉंग्रेस

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



छत्तीसगड राज्यातील पेट्रोमार जंगलात बेछूटपणे वृक्षांची कत्तल होत आहे. उद्योजक गौतम अदानी यांना कोळशाचे उत्खनन करण्यासाठी जंगलाचा भूखंड देण्यात आला असून याच परिसरात आदिवासींचे देवस्थान आहे. त्यामुळे ही जंगलतोड तात्काळ थांबवावी यासाठी आज आदिवासी कॉंग्रेस सेलने जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने केलीत.

निवेदनात म्हटले आहे की, छत्तीसगडमधील पेट्रोमार जंगलात मुलबक प्रमाणात कोळसा उपलब्ध आहे. या कोळशाचे उत्खनन करण्यासाठी उद्योजक गौतम अदानी यांना बेकायदेशीरपणे ९२ हेक्टर जंगल देण्यात आले आहे. त्याठिकाणी बंदोबस्तामध्ये वृक्षतोड होत आहेत. परिणामी, आदिवासी समाजाच्या भावना दुखावल्या जात आहेत. त्यामुळे तात्काळ वृक्षतोड थांबवून उत्खनन बंद करावे; अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन महाराष्ट्रभर छेडले जाईल; असा इशारा प्रशासनाला देण्यात आला. तशा आशयाचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयात देण्यात आले. याप्रसंगी आदिवासी कॉंग्रेस सेलचे जिल्हाध्यक्ष दिपक अहिरे, नंदुरबार लोकसभा समन्वयक भानुदास गांगुर्डे, विजय मोरे, बापू ठाकरे, एकनाथ ठाकरे आदी उपस्थित होते.

# सकल मराठा क्रांती मोर्चाच्या शिष्टमंडळाने घेतली जरांगे पाटील यांची भेट

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



नाशिक सकल मराठा क्रांती मोर्चाच्या शिष्टमंडळाने अंतरवाली सराटी या ठिकाणी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांची नुकतीच भेट घेत मुंबई येथील आंदोलनाच्या संदर्भात चर्चा करण्यात आली. त्याचबरोबर मुंबई आंदोलनाच्या संदर्भात त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, सिन्नर, येवला, नांदगाव, मालेगाव, चांदवड, देवळा, सटाणा, कळवण, दिंडोरी, निफाड, नाशिक शहर येथून मराठा आरक्षण आंदोलनासाठी झालेल्या तयारीची सर्व माहिती यावेळी जरांगे पाटील यांना देण्यात आली.

यावेळी नाशिक सकल मराठा क्रांती मोर्चाच्या शिष्टमंडळात मराठा क्रांती मोर्चा समन्वयक करण गायकर, सुनील बागुल, शिवाजी सहाणे, विलास पांगरकर, चंद्रकांत बनकर, नानासाहेब बच्छाव, योगेश नाटकर, हर्षल पवार, निलेश ठुबे, ज्ञानेश्वर कवडे, वैभव दळवी, ज्ञानेश्वर सुराशे, संदीप कुठे, विकी देशमुख, राम निकम, ईशान गोवर्धने, शरद लोणकर, उत्तम कदम, प्रा. मंगेश कदम, संजय सोमासे, गोरख संत, बाळासाहेब घनगाव, गोरख कुंदे आदींसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नाशकातील अनाधिकृत बांधकामे मनपा अधिकाऱ्यांच्या आशीर्वादानेच

**आ.फरांदे यांनी आरोप करत धडक कारवाई करण्यास पाडले भाग**

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



नाशिक शहरात सध्या मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे होत असून नाशिक महापालिकेचे मात्र या अतिक्रमणांकडे दुर्लक्ष होत आहे. इंदिरानगर भागात सायकल ट्रॅकच्या शेजारी मोठ्या प्रमाणावर अनाधिकृत बांधकामे झाले असून यात मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर धंदे होत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी आ. देवयानी फरांदे यांच्याकडे केलेल्या होत्या. याबाबत नाशिक मनपाला तक्रार देऊनही कोणतीही कारवाई झाली नसल्याने आ. फरांदे यांनी या अनाधिकृत बांधकामांवर धडक कारवाई करण्याची मोहीम काढली.

यावेळी नाशिक मनपा अतिक्रमण उपायुक्त नितीन नेर, विभागीय अधिकारी राजाराम जाधव, नगररचना विभागाचे एन. एस. शिरसाठ यांच्यासह इंदिरानगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक शरमाळे, महावितरण कंपनीचे कनिष्ठ अभियंता सोनवणे आदी अधिकार्यांसह मोठ्या प्रमाणावर परिसरातील नागरिक व महिला उपस्थित होत्या.

# ‘वाहतूक सुरक्षा सप्ताह’ची उदासीनता; ना प्रबोधन, ना जनजागृती

देशभरात जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात वाहतूक सुरक्षा सप्ताह पाळला जातो. वाढत्या अपघातांना आळा घालण्यासाठी वाहतूक पोलिस शाखांकडून प्रबोधनात्मक व जनजागृतीपर उपक्रम सप्ताहात राबविणे अपेक्षित असते. परंतु, शहर व ग्रामीण पोलिस दलाला या वाहतूक सुरक्षा सप्ताहाचा विसरच पडला की काय असे दिसते आहे.

जिल्ह्यात रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे; मात्र धुळे शहरात वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे दिसून आले. अभियानांतर्गत जनजागृतीवर भर देण्यात येत असला तरी अंमलबजावणी मात्र कुठेच दिसून येत नाही. रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या निमित्ताने शहरात ठिकठिकाणी वाहतूक शाखेकडून वाहनांवर कारवाई होत असतानाही वाहतूक नियम सर्रास पायदळी तुडवले जात आहेत. सुरक्षा सप्ताह सुरू असताना तरी वाहतुकीला शिस्त लागेल, अशी अपेक्षा असताना तसे होताना दिसून येत नाही. दुचाकी, चारचाकी वाहने बेदरकारपणे चालवणे, कर्कश हॉर्न वाजविणे, धावत्या दुचाकीवर मोबाइलवर बोलणाऱ्याची संख्या कमी नाही. तसेच शालेय विद्यार्थी आणि प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षांमध्ये कोंबाकोंबी सुरूच आहे. अवैध प्रवासी वाहतूक परवाना न हाताळणे, इंग्रजी, मराठी फॅन्सी नंबर प्लेट, काळ्या काचा वापरणे, विना हेल्मेट दुचाकी चालवणे आदी नियम तोडणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली असल्याचे वाहतूक पोलिसांनी सांगितले असले तरी मात्र वाहतूक पोलिसांनी कारवाई करूनदेखील वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. शहरात वाहने पार्किंगसाठी व्यवस्था नसल्याने अनेक वाहने रस्त्याच्या बाजूला नियमबाह्य उभी राहत असून, वाहनचालकांनी वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवले आहेत. वाहनचालकांना शिस्त लावण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून सुरक्षा सप्ताहाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येते; परंतु वाहनचालक याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे समोर येत आहे. हेल्मेटविषयी मोटार सायकलस्वारांमध्ये मोठ्या प्रमाणात उदासीनता असल्याचे निदर्शनास आले.



शोध बातमी

पुरुषोत्तम पाटील

मुख्य उपसंपादक

मो.7057011126

**अल्पवयीन मुलांच्या हाती दुचाकी!**

**शहरातील प्रत्येक चौकात व अनेक ठिकाणी रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या काळातच वाहतूक नियमाकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. शहरात सर्वत्र अल्पवयीन मुलेही दुचाकी चालविताना आढळून येत आहेत. एका दुचाकीवर तीन ते चार जण व विना परवाना सुसाट सुटत अनेक अल्पवयीन मुले, मुली दुचाकी वाहने चालविताना सकाळ-संध्याकाळी मोठ्या प्रमाणात दिसून येतात. ग्रामीण भागात जाणाऱ्या ऑटोसह काळी पिवळी वाहनांमध्येही क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी नेले जात असल्यामुळे काही ठिकाणी दररोज लहान- मोठे अपघात होत आहेत.**

**उपक्रमांचाच विसर**

**रस्ता वाहतूक सुरक्षा सप्ताह अभियानांतर्गत यापूर्वी वाहतूक पोलिस शाखांकडून विभागनिहाय प्रबोधनात्मक व जनजागृतीपर उपक्रम राबविले जात. शाळा-महाविद्यालयांमध्ये वाहतूक नियमांचे पालन करण्यासंदर्भात परिसंवाद, वक्तृत्व , निबंध स्पर्धा घेण्यात येतात. याशिवाय, प्रत्यक्ष वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्याविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्याऐवजी त्यांचे प्रबोधन केले जात.**

# गावठी कट्टा बाळगणारा गुंड मखमलाबादला जेरबंद

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

मखमलाबाद गावातील बसस्थानक परिसरात गावठी कट्टा बाळगून दहशत निर्माण करण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका गुंडास म्हसरूळ पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याचा दुसरा साथीदार मात्र पसार झाला आहे.

म्हसरूळ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रेकॉर्डवरील गुन्हेगार कुणाल सुधाकर एखंडे असे गावठी घेऊन येणार असल्याची माहिती पोलिस अंमलदार गुणवंत गायकवाड यांना मिळाली होती. वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजू पाचोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी मखमलाबाद बसस्थानकावर सापळा लावला असता पोलिसांची चाहूल लागताच दोघेही पळून जाऊ लागले. त्यातील कुणाल सुधाकर एखंडे यास गावठी बनावटीच्या कट्ट्यासह ताब्यात घेतले. त्याचा दुसरा साथीदार सोनू धात्रक हा मात्र फरार झाला. सदर कामगिरी वरिष्ठ निरीक्षक राजू पाचोरकर, सहाय्यक निरीक्षक सुधीर पाटील, विनायक आहिरे, सहाय्यक उपनिरीक्षक व्ही. जे. भोज, सतीश वसावे, संजय गवारे, सोनवणे, यांनी केली आहे.

## आघाडीची अडचण

बसपच्या मतांची टक्केवारी कमी झाली असली तरी निकाल बदलण्याची ताकद मायावतींकडे आहे. दलित आणि अल्पसंख्याक यांच्या एकगठ्ठा मतांच्या माध्यमातून भाजपला पराभूत करण्याच्या इंडिया आघाडीच्या निर्णयावर मायावतींच्या भूमिकेचा परिणाम शक्य आहे.

बहुजन समाज पक्षाच्या प्रमुख मायावती यांनी लोकसभा स्वबळावर लढण्याचा निर्णय जाहीर केला. 'इंडिया' आघाडीच्या, विशेषतः काँग्रेसच्या अडचणी यामुळे वाढणार आहेत. भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या ब संघात मायावतींचा समावेश आहे, अशी टीका आधीही होत होती. आता ती वाढणे क्रमप्राप्त दिसते. मायावती यांनी इंडिया आघाडीत यावे, ही काँग्रेसची भूमिका होती. भारतीय जनता पक्षाच्या विरोधात असलेल्या मतांचे विभाजन टाळता आले तरच केंद्रातील सरकार बदलता येईल, हे व्यावहारिक सूत्र. काँग्रेसकडून त्यादृष्टीने लवचिक भूमिका घेतली जात असताना इंडिया आघाडीतील काही घटक पक्ष तडजोडीस तयार नसल्याचे वेळोवेळी समोर आले. मायावतींचा इंडिया आघाडीत प्रवेश होणे समाजवादी पक्षाला नको होते. बसपचा समावेश झाला तर आम्हाला इंडिया आघाडीत राहायचे की नाही याचा निर्णय घ्यावा लागेल, असे समाजवादी पक्षाचे नेते शिवपाल यादव यांनी काँग्रेसला थेट सुनावले. काँग्रेस आणि समाजवादी पक्ष यांच्यातील अलीकडची बैठक अवघ्या दहा मिनिटांत संपली, याचेही कारण मायावती! मायावतींबद्दलच्या तुमच्या भूमिकेबद्दल स्पष्ट माहिती द्या, त्यानंतरच उत्तरप्रदेशातील जागा वाटपासंदर्भात बोलता येईल, असे समाजवादी पक्षाने काँग्रेसला बजावले. अखेर बसपचा इंडिया आघाडीतील प्रवेश रद्द झाला. 'अखिलेश म्हणजे रंग बदलणारा सरडा आहे', अशी जहरी टीका मायावती यांनी केली आहे. स्वबळावर लढण्याचा त्यांचा निर्णय भाजपच्या पथ्यावर पडणार हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह

एकेकाळी मायावती 'किंगमेकर'च्या भूमिकेत होत्या. मात्र, सत्तेसाठी त्यांनी वारंवार केलेल्या तडजोडींमुळे त्या-त्या वेळी त्यांचा फायदा झाला तरी त्यांच्या राजकीय विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह लागले. मध्य प्रदेशात गोंडवन गणतंत्र पक्षासोबत युती करुन बसपने विधानसभा निवडणूक लढविली. तेथे बसपची कामगिरी निराशाजनक झाली. राजस्तानात बसपला केवळ दोन जागा जिंकता आल्या. मात्र सर्वत्र मतांची टक्केवारी कमी झाली असून मायावतींपुढे ते मोठे आव्हान राहणार आहे. राष्ट्रीय पक्ष म्हणून बसपचा दर्जा धोक्यात आला आहे. सक्रिय राजकारणाच्या दृष्टीने २०२४ ची लोकसभा निवडणूक मायावतींची शेवटची निवडणूक आहे. याआधीच त्यांनी आपले भाचे आकाश आनंद यांना उत्तराधिकारी घोषित केले आहे. कांशीराम यांच्यानंतर मायावतींनी बहुजन पक्षाचा विस्तार केलाच; पण उत्तरप्रदेशात सत्ता देखील मिळवून दाखवली. ते वलय आकाश आनंद यांच्याकडे नाही. संघटनेला उभारी मिळवून देण्यात त्यांचा किती उपयोग होणार हे आगामी काळच ठरवेल. आता तरी मायवतींची भूमिका भाजपसाठी दिलासा देणारी आहे. भाजपनेही त्यांना आवश्यक तो दिलासा दिलाच आहे. अन्य विरोधकांवर ईडीचे छापे पडले, मायावतींवर अनेक आरोप होऊनही ईडीकडून कारवाई झाली नाही. ताज कॉरिडर गैरव्यवहाराच्या चौकशीचा अधिकार उत्तर प्रदेश सरकारला आहे. तो बजावला गेला नाही, यातच सर्व आले! संसदेत अनेक महत्त्वाच्या विधेयकांच्या मंजुरीत भाजपला मायावतींची अप्रत्यक्ष आणि बहुमोल साथ मिळाली आहे. एवढे असताना मायावती यांची भाषा मात्र भाजप आणि काँग्रेसला समान अंतरावर ठेवण्याची आहे! भाजपला रोखण्यासाठी पावले उचलताना काँग्रेसने काही अडचणी स्वतः निर्माण केल्या, त्या पक्षाचे काही नेते त्यासाठी हातभार लावत आहेत आणि बाकी काम भाजपविरोधक म्हणविणाऱ्या मायावती, अथवा ममता पार पाडत आहेत. 'येत्या निवडणुकीत भाजप सर्वात मोठा पक्ष ठरेल', हे शशी थरूर यांचे विधान त्याच धर्तीचे. सर्वात मोठा ठरणारा पक्ष सत्तेवर मात्र येणार नाही, ही त्यांची मखलाशी काँग्रेसचे नीतिधैर्य वाढविणारी निश्चित नाही. दक्षिण मुंबई लोकसभा मतदार संघातून लढण्याच्या हट्टापायी मिलिंद देवरा यांनी काँग्रेस पक्ष सोडला. पूर्वी काँग्रेसला विरोधकांच्या मतविभाजनाचा फायदा झाला, आता भाजपला तो होत आहे, एवढाच बदल!

# हेच का 'भारत जोडो'चे फलित?

मुंबई काँग्रेसचा उच्चविभूषित, सुसंस्कृत व उद्योग-व्यावसायिक चेहरा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मिलिंद देवरा यांनी काँग्रेसची साथ सोडली आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचा भगवा हाती घेतला. मिलिंद देवरा हे काँग्रेसमधील तरुणाईचा चेहरा होता. केंद्रात व विविध राज्यांत सहा दशकांहून अधिक काळ सत्ता उपभोगलेल्या काँग्रेसची अवस्था आज दयनीय आहे. सन २०२४ मध्ये काँग्रेसचे काय होणार आहे याचे उत्तर काँग्रेसमधील ऐंशी पार केलेल्या मल्लिकार्जून खरगेंकडे नाही आणि भारत जोडो न्याय यात्रा काढणाऱ्या चाळिशी पार केलेल्या राहुल गांधींकडेही नाही. केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्षावर ऊठसूठ टीका करून सतत मोदींच्या विरोधात नकारात्मक भूमिका घेऊन पक्ष कसा वाढणार, याचे आत्मचिंतन करायला काँग्रेसच्या नेत्यांना वेळ नाही.

लोकसभा निवडणुका तीन महिन्यांवर येऊन ठेपल्या आहेत. ज्या देवरा घराण्याचा काँग्रेस पक्षाशी व गांधी परिवाराशी गेली पंचावन्न वर्षे संबंध होता, ते नाते तोडून मिलिंद देवरा एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत सामील झाले, याचे काँग्रेसमधील कोणालाच काही वाटत नाही, याचे मोठे आश्चर्य वाटते. काँग्रेसमध्ये नव्याने कोणी येत नाही, आयाराम येत नाहीत. मात्र गयारामांची सतत नवीन नावे झळकताना दिसत आहेत. बहुतेकजण भाजपाच्या वाटेवर जात आहेत. मिलिंद देवरा काँग्रेस सोडून शिवसेनेत गेले ही काँग्रेसला मुंबईत फार मोठी इशारा घंटा आहे. केंद्रात, राज्यात नि मुंबई महापालिकेतही काँग्रेसची सत्ता नाही. विरोधी पक्ष म्हणून काँग्रेसचा कुठेच प्रभाव नाही. केवळ 'भारत जोडो'चा गवगवा करून २०२४ मध्ये फार काही साध्य होईल, असे वातावरण नाही. गेल्या दहा वर्षांत मोदी सरकारने चौफेर विकास आणि जनकल्याणकारी योजना थेट घरापर्यंत पोहोचविण्यात जी मुसंडी मारली आहे, त्याला विरोध करून काँग्रेसला काय मिळणार? मिलिंद देवरा हे काही मैदानावर गर्दी खेचणारे नेते नाहीत. पण नेहमी सकारात्मक विचार व विकासाला साथ ही त्यांची विचारसरणी आहे. देवरा यांच्या शिवसेना प्रवेशाने काँग्रेस व उबाठा सेनेला एकाचवेळी धक्का बसला आहे. मिलिंद यांच्या निर्णयाने मुंबईतील लोकसभा निवडणुकीचे



समीकरण बदलणार आहे. काँग्रेस, उबाठा सेना व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या महाआघाडीला चाप लावण्याचे काम मिलिंद देवरांच्या शिवसेना प्रवेशाने होणार आहे.

मिलिंद देवरा यांचे वडील मुरली देवरा हे मुंबई काँग्रेसमधील फार मोठे प्रस्थ होते. मुंबई काँग्रेसच्या उभारणीत मुरली देवरांचे मोठे योगदान होते. मुंबई काँग्रेसचे बावीस वर्षे अध्यक्ष राहण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. देवरा पिता-पुत्रांनी राजकारणात वा सार्वजनिक जीवनात कधीच कोणाला दुखावले नाही. कोणावर व्यक्तिगत टीका केली नाही. कोणाशी कट्टर दुष्मनी ठेवली नाही. कोणाचे नुकसानही केले नाही. सकारात्मक व विधायक राजकारण हाच पिता-पुत्रांचा पिंड आहे. मिलिंद यांना वडिलांच्या पुण्याईचा लाभ झाला पण त्याचा त्यांनी गैरफायदा उठवला असे कधी ऐकायला मिळाले नाही. मुंबई काँग्रेसच्या विद्यमान अध्यक्षा वर्षा गायकवाड यांनाही वडिलांच्या पुण्याईचा लाभ मिळाला. त्या चार वेळा धारावी मतदारसंघातून आमदार झाल्या, मंत्रीपदाचाही त्यांना लाभ झाला. पण मुंबई काँग्रेसमधील नेत्यांच्या गटबाजीत त्यांचे किती चालते, हे त्याही सांगू शकणार नाहीत. त्यांचे वडीलही मंत्री, खासदार, मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष होते. मिलिंद देवरा शिवसेनेत गेल्यानंतर वर्षाताई संघर्ष करो, मुंबई आप के साथ है, असे फलक मुंबईत झळकले आहेत. पण संघर्ष करायला पक्षाच्या नेत्यांना वेळ आणि सवड आहे कुठे? संघर्ष नेमका कोणाच्या विरोधात करायचा, अशा संभ्रमात काँग्रेस आहे.

मिलिंद देवरा यांचे उद्योग व्यवसायाशी उत्तम संबंध आहेत. निधी संकलनासाठी अशा नेत्याची प्रत्येक पक्षाला गरज असतेच; पण राहुल गांधींपासून काँग्रेसचे नेते, प्रवक्ते ऊठसूठ अंबानी आणि अदानींवर टीकेची झोड उठवत असतील, तर त्यातून पक्षाला कोणाची सहानुभूती तर मिळत नाहीच पण पक्षाचे नुकसान होते, याची उत्तम समज मिलिंद यांना आहे. म्हणून पक्षाने अंबानी, अदानींवर सतत चालू ठेवलेल्या हल्ल्याबद्दल देवरांनी नापसंती व्यक्त केली आहे. मिलिंद यांची व्यावसायिक उपयुक्तता पाहूनच काँग्रेस पक्षाने डिसेंबरमध्ये त्यांची अ. भा. काँग्रेसचे संयुक्त खजिनदार म्हणून नियुक्ती केली. मिलिंद यांना निवडणुकीच्या तोंडावर अशी जबाबदारी दिली पण त्यांच्याशी थेट संवाद साधण्यासाठी राहुल किंवा खरगे यांना वेळ मिळू नये, याचे आश्चर्य वाटते. मुंबईची लोकसंख्या दीड कोटींच्या घरात आहे. पण मुंबईत मराठी भाषिक हे वीस-पंचवीस लाखांच्या आसपास आहेत हे वास्तव आहे. केवळ मराठी मराठी करून कोणत्याही राजकीय पक्षाला निवडणुका जिंकता येत नाहीत, हे मराठीचे कैवारी असा दावा करणाऱ्या सर्वांना समजते. मुंबईच्या कॉस्मॉपॉलिटन वातावरणाला मिलिंद देवरा हा मान्य असलेला चेहरा आहे.

विशेषतः दक्षिण मुंबईत अमराठी, हिंदी भाषिक, मुस्लीम मतदार मोठ्या संख्यने आहेत. त्यांना आपलासा वाटणारा मिलिंद देवरा हा चेहरा आहे. त्याचा लाभ येत्या निवडणुकीत शिवसेना-भाजपा युतीला होईल, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. मिलिंद देवरा यांनी सन २००४ मध्ये दक्षिण मुंबईतून लोकसभा निवडणूक जिंकली व ते सर्वात तरुण खासदार म्हणून प्रकाशात आले. याच मतदारसंघातून त्यांचे पिताश्री हे लोकसभेवर अनेकदा निवडून आले होते. सन २००९ मध्ये मिलिंद याच मतदारसंघातून काँग्रेसच्या तिकिटावर पुन्हा खासदार म्हणून निवडून आले. केंद्रात डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकारमध्ये ते दळणवळण, माहिती-तंत्रज्ञान, नौकानयन अशा खात्यांचे राज्यमंत्रीही होते. दक्षिण मुंबईसाठी देवरा नेहमीच आग्रही राहिले. पण महाआघाडीत ही जागा उबाठा सेनेकडे आहे, गेली दोन टर्म अरविंद सावंत हे खासदार आहेत. महाआघाडीत ही जागा पुन्हा उबाठाला जाणार, उबाठा आपला हक्क सोडणार नाही आणि काँग्रेसही ती जागा मागण्याच्या मन:स्थितीत नाही, असे लक्षात आल्यावर मिलिंद यांना काँग्रेस सोडण्याशिवाय पर्याय उरला नसावा. मिलिंद यांच्या शिवसेना प्रवेशामुळे काँग्रेसने दक्षिण मुंबईचा हक्काचा उमेदवार गमावला आहेच; पण मुंबईतील बिझनेस सर्कल व दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांचे राजकीय सर्कल असा दुवा साधणारा युवा नेता एकनाथ शिंदे यांच्या पक्षाला मिळाला आहे. एकनाथ शिंदे यांच्याकडून मिलिंद यांनी हाती भगवा स्वीकारला, तेव्हा आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर विश्वास दाखवत त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना साथ देणार असल्याचे सांगितले.

केवळ मोदींना विरोध हा एककलमी कार्यक्रम काँग्रेस राबवत असल्याचे मिलिंद यांनी म्हटले आहे. मिलिंद देवरा म्हणतात - अब उसका एक ही लक्ष्य है, पीएम मोदी जो कहते हे, उसके खिलाफ बोलना अगर वह कहते है, की काँग्रेस एक बहुत अच्छी पार्टी है, वे इसका भी विरोध करेंगे मिलिंद देवरा हे लोकसभा निवडणूक लढवणार की राज्यसभेवर शिवसेनेच्या वतीने खासदार म्हणून जाणार, याची चर्चा मीडियातून चालू आहे. पण त्याविषयी स्वत: मिलिंद गप्प आहेत. गेल्या ५५ वर्षांचा असलेला काँग्रेसचा घरोबा तोडून त्यांनी शिवसेनेत नवा अध्याय सुरू केला आहे. राहुल गांधी यांची कन्याकुमारी ते काश्मीर ही पहिली 'भारत जोडो' यात्रा सुरू झाली तेव्हा गुलाम नबी आझाद यांनी काँग्रेसला अलविदा केला होता. आता राहुल यांची मणिपूर ते मुंबई दुसरी भारत जोडो न्याय यात्रा सुरू झाली, त्याच मुहूर्तावर मिलिंद देवरा यांनी काँग्रेसला रामराम केला. राहुल गांधींची टीम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अनेक युवा नेत्यांनी व दिग्गजांनी काँग्रेसला सायो नारा केलाय. गुलाम नबी आझाद (जम्मू- काश्मीर), ज्योतिरादित्य शिंदे (मध्य प्रदेश), जतीन प्रसाद (उत्तर प्रदेश), अमरिंदर सिंग (पंजाब), कपिल सिब्बल (दिल्ली), हार्दिक पटेल (गुजरात), सुनील जाखड (पंजाब), कीर्ती आझाद (बिहार), लुइजिन्हो फलेरियो (गोवा), मुकुल संगमा (मेघालय), सुष्मिता देव (आसाम), शत्रुघ्न सिन्हा (बिहार), अश्विनी कुमार (हिमाचल प्रदेश), आरपीएन सिंग (उत्तर प्रदेश), जयवीर शेरवील (पंजाब), अशोक तन्वर (हरियाणा) आणि या मालिकेत नवीन भर पडली मिलिंद देवरा (मुंबई). हेच का भारत जोडेचे फलित...

**- डॉ. सुकृत खांडेकर**

# न जावे कुणी अपघातांच्या गावा...

पूर्वीच्या काळी लोकांना मैलापेक्षा अधिक अंतर चालत जावे लागत असे. देवदर्शनासाठी किंवा तालुक्याच्या ठिकाणी घरातून गाठोडे घेऊन पायवाटेने पुढे चालत राहायचे. याच पायवाट्याचे पुढे रस्त्यात रूपांतर झाले. दुचाकी, चारचाकी वाहने आली तसा जनतेचा एक-दोन किलोमीटर चालण्याचा सराव बंद झाला आणि खासगी वाहने किंवा सार्वजनिक वाहनांतून प्रवास सुरू झाला; परंतु गेल्या चाळीस-पन्नास वर्षांत वाहनांची संख्या एवढी वाढली आहे की, त्यातून अपघातांची संख्या वाढत गेली, याकडे स्वतंत्रपणे पाहण्याची गरज आहे. ९०च्या दशकात दोन शहरांमधील अंतर कमी करण्यासाठी राज्यात मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाची निर्मिती झाली. वाहतुकीची कोंडी दूर करण्यासाठी उड्डाण पूल निर्माण झाले. २०२३ मध्ये मुंबई-नागपूर समृद्धी मार्ग तयार झाला. पण, अपघातांचे प्रमाणही वाढताना दिसले.

अपघाताला एकच नाही तर अनेक कारणे सकृतदर्शनी दिसत असली, तरी ती रोखण्यासाठी जनजागृतीची आवश्यक भासते. राज्य सरकारकडून दरवर्षी सुरक्षा सप्ताह आठवडा, पंधरवडा असे कार्यक्रम घेतले जातात. खरंतर, सुरक्षितता हा जीवनाचा एक मार्ग आहे. रस्ता सुरक्षेबाबत लोकांमध्ये जनजागृती व्हावी, या उद्देशाने दरवर्षी राष्ट्रीय आणि राज्यस्तरावर रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा केला




जातो. या कार्यक्रमातून वाहनचालकांची जनजागृती करण्याचा प्रयत्न होतो. तसा राज्यात १५ जानेवारी ते १४ फेब्रुवारी २०२४ या एक महिन्याच्या कालावधीसाठी रस्ता सुरक्षा अभियान राबवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्याचे कारण एकूण मृत्यूंमध्ये सर्वात जास्त मृत्यू रस्ता अपघातांमध्ये असल्याचे दिसून आले. त्यामुळे रस्ता अपघात टाळण्यासाठी रस्ता सुरक्षा ही काळाची गरज आहे.

परिवहन विभागामार्फत राज्य रस्ता सुरक्षा अभियानाला सुरुवात झाली असली तरी, विविध नावीन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये वाहतूक नियमांबाबत जनजागृती करण्यात येत आहे. स्पीड गनचा वापर करून अतिवेगावर नियंत्रण आणणे किती महत्त्वाचे आहे. तसेच चालकांनी कटाक्षाने वाहतूक नियम पाळावेत. त्यामुळे निश्चितच अपघात कमी होतील, असा विश्वास महामार्ग पोलिसांना वाटतो. तसेच राज्यात होत असलेल्या अपघातांमधील आकडेवाडी पाहता ६० टक्के अपघात हे दुचाकीचे असतात. दुचाकी अपघात कमी करण्यासाठी हेल्मेट वापरण्याविषयी जनजागृती करण्यात येत आहे. अपघातांचे प्रमाण शून्यावर आणण्यासाठीही वेगवेगळ्या उपाययोजना करण्यात येत आहेत. अपघातग्रस्ताला उपचार देण्यासाठी नागरिक पुढे येत नव्हते. मात्र, आता चित्र बदलत आहे. अनेक नागरिक पुढे येऊन 'गोल्डन अवर'मध्ये उपचार देऊन अपघातग्रस्तांचे प्राण वाचवत आहेत, ही चांगली बाब आहे. रस्ते वाहतूक नियमांचे पालन करीत शिस्तबद्ध वाहने चालविल्यास अपघातांचे प्रमाण कमी होऊ शकतात. अपघाताचे ठिकाण निश्चित करून त्या ठिकाणी जनजागृतीसाठी विशेष मोहीम राबविणे गरजे आहे. वाहतुकीचे नियम पाळणे ही सामूहिक जबाबदारी आहे.

नागरिकांमध्ये जनजागृती करून अपघाताचे प्रमाण कमी होण्याचे उद्दिष्ट ठेवून काम करावे लागणार आहे. या आधी महामार्ग पोलिसांनी मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर अपघाताची मालिका खंडित करण्यासाठी विशेष मोहीम राबविली आहे. या मोहिमेद्वारे अपघातांच्या संख्येत घट होताना दिसून आले आहे. जानेवारी ते डिसेंबर २०२२च्या तुलनेत जानेवारी ते डिसेंबर २०२३ मध्ये मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील अपघात घटले आहेत. महामार्ग पोलीस, आरटीओ विभागाकडून वारंवार जनजागृती कार्यक्रम, वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केल्याने, अपघातांना ब्रेक लागल्याचे समोर आले आहे. जानेवारी ते डिसेंबर २०२२ मध्ये मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर एकूण ३२९ अपघातांची नोंद झाली होती. यातील १५२ प्राणांतिक अपघात झाले असून यात १८६ जणांचा मृत्यू झाला, तर जानेवारी ते डिसेंबर २०२३ यादरम्यान २७१ अपघात झाले. यात १०३ अपघात हे प्राणांतिक असून यामध्ये १२६ जणांना आपला जीव गमावला. दोन वर्षांच्या तुलनेत अपघातांच्या संख्येत १७.६२ टक्क्यांनी, प्राणांतिक अपघातांत ३२.२३ टक्क्यांनी आणि मृतांच्या संख्येत ३२.२५ टक्क्यांनी घट झाली.

वेगमर्यादेपेक्षा अधिक वेगात वाहन चालवणे, वाहन चालवताना झोप येणे, रस्त्याची मार्गिका वारंवार बदलणे अशा प्रकारांमुळे अपघात वाढतात. मात्र हे प्रकार आरटीओ विभाग आणि महामार्ग पोलिसांकडून रोखले जात आहेत. यासह रस्ता सुरक्षा मोहीम राबवून वाहतूक नियमांविषयी जनजागृती केली जात आहे. रस्ता सुरक्षा अभियानात संपूर्ण महिनाभरात विशेष तपासणी मोहिमा योग्यता प्रमाणपत्र, विमा प्रमाणपत्र व पी.यू.सी. तपासणी करणे. ओव्हरलोड/रिफ्लेक्टर तपासणी, सिटबेल्ट, हेल्मेट, टेललाईट / हेडलाईट इत्यादी तपासणी करण्यात येणार आहे. रस्ता सुरक्षाविषयक जनजागृती व्हावी याकरिता चौका-चौकांत भिंतीपत्रके वाटप, चौक सभा, पथनाट्य प्रबोधन व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच नेत्र तपासणी शिबीर, रक्तदान शिबीर, अवयवदान जागृती अभियान राबविण्यात येणार आहेत. त्यामुळे आपल्या परिसरातील रस्त्यावर (गावात) अपघात होऊ नये यासाठी रस्ता सुरक्षा अभियान एक महिन्याकरिता मर्यादित न ठेवता वर्षभर प्रत्येक कार्यालयाकडून, प्रत्येक नागरिकांकडून व वाहनचालकांकडून राबवणे गरजेचे आहे.

## शब्दकोडे-२९६



**आडवे शब्द** - १. जिंकणारा ३. पालिकेतील लोकप्रतिनिधी ७. प्रचंड, लईभारी! १०. तरतूद ११. मऊ १३. दारू (हिंदी) १४. खोटेपणा, लुच्चेगिरी १६. नीच, दुष्ट १९. 'कशाला उगाच' असा त्रास २२. वल्लारी, वेल २५. नगाऱ्याचा आवाज २८. शीख धर्माचे संस्थापक ३०. अर्थसंकल्प ३३. चंद्र ३५. मेंढपाळ ३६. लोखंड घासण्याचे हत्यार ३७. लाटण्याचा जोडीदार ३९. अनामिके शेजारचे बोट ४१. याच्या घरट्यात कोकिळा अंडी घालते अशी समजूत आहे ४३. पादत्राण ४४. तरतरीत ४६. लंबकर्ण पण गाढव नव्हे! ४७. जुन्या जमान्यीतल गाण्याची रेकॉर्ड ४८. पंख ४९. पुन्हा ५०. दुर्लक्ष, हेळसांड ५१. पल्याड ५२. हिंदी चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणारे 'सरदार' ५३. जाणता राजा ५५. चालू दिवस ५७. धूळधाण, नासाडी ५८. ज्वाळा, दाह ५९. वरपांगी, दिखाऊ ६१. माजलेला ६३. रूचीहीन, पचपचीत ६४. खळबळजनक ६६. कोवळ्या दुधाचा पदार्थ ६८. बासरी ७०. हिंदीत वचन ७१. दरवाजा ७२. इंद्रिय- उदा. हात, पाय ७३. वाळवी ७४. टोळीचा प्रमुख ७७. घोड्याचे अंग घासणे ७८. आत्या ७९. अवश्य!

**उभे शब्द** - १. भव्य, प्रचंड, खूप २. घाई, त्वरा ३. नूतन ४. सुगंधी फुलांची साजशृंगार वाढवणारी माळ ५. जंगल ६. हात ८. रीत, पद्धत ९. मध्यस्थ, अडत्या १२. अभिप्राय १५. पोते १७. 'एक ना -- भाराभर चिंध्या!' १८. बंगालच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री २०. पालकांची छत्रछाया असलेला २१. दुबळा, गरीब २३. विरह, फारकत २४. पणजोबांचे वडील २६. वाघाची ललकारी २७. रोटी-कपड्याबरोबर हे देखील हवेच २९. पंकज ३०. दृष्टीहीन ३१. विश्व, दुनिया ३२. ताज्या कैरीची फोड अशी लागते ३४. नासलेला ३७. बैलाचा एकमेव सण ३८. मर्यादा ४०. किल्लेदार ४२. कोळशाचे दुकान ४३. नेम, व्रत ४४. तापविणारा सूर्य ४५. नातेवाईक ४६. प्रसिद्ध पुणेरी पेठ ४८. मागील अंगणाचा दरवाजा ५०. मरेपर्यंत ५१. गवताचे रुंद पान ५२. स्वीय सचिव ५४. उत्तराधिकारी ५५. फोडणीचे वरण ५६. एक मिश्र धातू ५८. आजूबाजूला ६०. रसाळ ६२. पृथ्वीभोवतीचे हवेचे वेष्टन ६५. बाई ६६. 'खाई त्याला ----' ६७. सिंह ६९. नियमित यात्रेला जाणारा ७०. गाईचे बछडे ७३. राहुल देशपांडे याने पुनरूज्जिवित केलेले संगीत नाटक- '--- काळजात घुसली!' ७५. राणीची सेविका ७६. चौथा भाग

## शब्दकोडे-२९५ चे उत्तर

आडवे उत्तर

१.जनावर ४.संपादकीय ९.पहारेकरी ११.जबरदस्त १३.नयनबाण १६.तीट १७.मजा मारणे १८.वजीर २०.कारण २१.नवा २२.माती २३.अर्थहीन २४.साखळी २६.कान २८.कमाल २९.करतल ३२.वरवर ३४.सारा ३६.शीतल ३७.जागोजाग ३८.पारखा ३९.नजर ४२.मित्र ४३.मन ४४.माहीतगार ४६.ताशी ४७.वा ४८.तरूणी ५०.सीता ५१. विकार ५५.पायजमा ५७.हालहलाव ५८.अनामिका ५९.पाया ६०.काल ६१.रवळनाथ ६२.पाळत ६४.चारा ६६.जम ६७.नगर ६९.लखलखीत ७१.मालदार ७२.खिंड ७३.पावा ७४.परवा ७७.तरू ७८.भटारखाना ७९.जयजयकार

उभे उत्तर

१.जलन २.वचन ३.चहा ४.संकटकाळी ५.पारी ६.यजमान ७.तरणे ८.अस्तनीतील निखारा ९.पणजी १०.रेती १२.बरवा १४.यर्थाथ १५.बावनकशी १७.मणका १९.रसातल २२.मामा २३.अवसानघात २५.खल २७.नवजात २८.करपात्र ३०.रतन ३१.खाजा ३३.रग ३५.राज ४०.रमणीय ४१.रुपाया ५०.सीमा ५२.कालवड ५३.श्रीनाथ ५४.मुकादम ५६.जवळ ५७.हालचाल ५८.अनाकलनीय ५९.पावनखिंड ६२.पार ६३.तलवार ६५.राखी ६६.जरतर ६८.गड ७०.तप ७३.पाट ७५.रज ७६.वाय

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

**न्यूज कॉलम**

### निफाडला थंडीचा कडाका; पारा ७.४ अंशावर

**नाशिक ।** गेल्या दोन-तीन दिवसांपासून बदललेल्या वातावरणामुळे निफाड तालुक्यातील थंडीच्या कडाक्याने घसरणारा पारा सध्या चिंतेचा बनला आहे . ६.५ अंशावर असलेल्या वातावरणात थोडासा दिलासा मिळत ७.४ अंश वातावरण होते. सध्या निफाड तालुक्यात द्राक्ष हंगाम सुरू होण्याची स्थितीत असताना, बदलत्या वातावरणामुळे द्राक्ष उत्पादक शेतकरी हबकला कला आहे.

### कुलूप तोडून सव्वा लाखांचा ऐवज लंपास

**नाशिक ।** दिंडोरी शहरातील गौरी अपार्टमेंटमधील बंद फ्लॅटचे कुलूप तोडून अज्ञातांनी घरातील दागिने व मोबाइल असा एकूण एक लाख वीस हजारांचा ऐवज चोरून नेला. रवींद्र किसन पवार यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार किसन पवार यांची प्रकृती ठिक नसल्याने त्यांना उपचारासाठी नाशिक येथे घेऊन गेलो होता. या काळात अज्ञातांनी फ्लॅटचे कुलूप तोडून आत प्रवेश केला व तीन तोळे सोन्याचा पोहेहार आठ ग्रॅम कर्णफुलांचा जोड व शेजारी राहणारे पोपट पाटील यांच्या घरातील मोबाइल चोरून नेला.

# जरांगे पाटील यांच्या लढ्यात नाशिक जिल्ह्यातून लाखो समाज बांधव पिंपरी चिंचवडला जाणार

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून अंदाजे प्रत्येकी एक ट्रक याप्रमाणे तांदूळ, डाळ, तेल, शेंगदाणे व मसाल्याचे पदार्थ याप्रमाणे साहित्य समाज बांधवांनी आपापल्या स्वयंस्फूर्तीने जमा केले आहेत. हे सर्व साहित्य मुंबई येथे होणाऱ्या आंदोलनासाठी येणाऱ्या समाज बांधवांच्या जेवणाची व्यवस्था करण्यासाठी वापरण्यात येणार असून ज्या तालुक्यातून ते साहित्य जमा झाले आहे त्या तालुक्यातील समाज बांधवांनी त्यांची एक कमिटी निर्माण करून ते सर्व साहित्य ट्रकमध्ये भरून आंदोलन स्थळापर्यंत नेण्याची तसेच त्या ठिकाणी जेवणाची व्यवस्था करणाऱ्या समाज बांधवांना ते सोपवण्याची जबाबदारी घेतलेली आहे. दरम्यान मराठा योद्धा जरांगे पाटील यांच्या लढ्यात नाशिक जिल्ह्यातून लाखो समाज बांधव २४ जानेवारीस कार, मोटारसायकल रॅलीने पिंपरी चिंचवडला जाणार आहेत. अशी माहिती सकल मराठा समाजातर्फे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये देण्यात आली.



या पत्रकार परिषदेसाठी सुनील बागुल, चंद्रकांत बनकर, विलास पांगरकर, करण गायकर, शिवाजी सहाणे, नानासाहेब बच्छाव, आशिष हिरे, राम पाटील, योगेश गांगुर्डे, नवनाथ कांडेकर, योगेश नाटकर, ज्ञानेश्वर कवडे, निलेश ठुबे, बाबासाहेब जोगदंड, शुभम देशमुख, एकता खैरे, स्वाती जाधव, मनीषा जाधव, हर्षल पवार, गायकर, वैभव दळवी, शरद लोणकर, ज्ञानेश्वर सुराशे, ईशान गोवर्धने, सागर वाबळे, नाना पालखेडे, संदीप बरे, राहुल काकळीज आदी उपस्थित होते.

नाशिक शहरातून नवीन नाशिक, सातपूर, नाशिकरोड पंचक्रोशी देवळाली कॅम्प, वडनेर, पाथर्डी, इंदिरानगर या परिसरातून अनेक समाज बांधवांनी जेवणासाठीचे पदार्थांचे साहित्य जमा केलेले असून ते देखील एका ठिकाणी जमा करण्याचे काम सुरू आहे. हे सर्व साहित्य या समाज बांधवांनी निर्धारित केलेल्या आंदोलनस्थळी पोहोचवणार आहेत. नाशिक जिल्ह्यातून मराठा आरक्षणाच्या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी प्रत्येक तालुक्यातून किमान २५ ते ३० हजार समाज बांधव आपापल्या वाहनातून आंदोलनस्थळी पोहोचवणार आहेत. तर आंदोलनाची यशस्वी सांगता झाल्यानंतर म्हणजेच आरक्षण मिळाल्यानंतर कुठल्याही प्रकारची हुल्लडबाजी न करता आनंद साजरा करत आपापल्या घरी सुखरूपपणे समाज बांधवांनी पोहोचावे यासाठी नियोजन सुरू आहे अशी माहिती यावेळी देण्यात आली.

या अगोदरच्या नियोजनाप्रमाणे नाशिक जिल्ह्यातील सर्व समाज बांधव हे इगतपुरी तालुका वगळता नाशिक येथील न्यायालयासमोरील शिवतीर्थावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाजवळ दि. २४ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता जमून विल्होळी गावापर्यंत पायी व त्यानंतर आपापल्या वाहनाने मुंबईकडे रवाना होणार होते. परंतु काल अंतरवाली सराटी येथे जाऊन मनोज जरांगे पाटील यांच्याबरोबर चर्चा केल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी सुचवल्यानुसार नाशिक जिल्ह्यातील सर्व आंदोलन समर्थक समाज बांधव हे दि. २४ रोजी सकाळी आठ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाजवळ जमल्यानंतर मुंबईच्या दिशेने रवाना न होता पुण्याच्या दिशेने रवाना होतील. प्रत्येक मोटरसायकलवर फक्त दोनच समाज बांधव याप्रमाणे प्रत्येक समाज बांधवांनी स्वसंरक्षणासाठी हेल्मेट घालून मोटरसायकल रॅली नाशिक शहर व प्रत्येक तालुक्यातून पिंपरी चिंचवड शहराकडे रवाना होईल. त्या ठिकाणी हे सर्व मोटरसायकल रॅलीतील समाजबांधव आणि मनोज जरांगे पाटलांचे स्वागत करून ज्यांना शक्य असेल त्यांनी ते तिथून पुढे आंदोलनात सहभागी होऊन मुंबईच्या दिशेने जाऊन सहभाग घेणार आहेत. सर्व समाज बांधवांनी आपापल्या वाहनांवर भगवे ध्वज व आरक्षण समर्थक बॅनर आपापल्या वाहनांवर लावायचा आहे असे आवाहन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे तालुक्यातून आलेल्या सर्व अन्नधान्य साहित्याच्या ट्रकवर आपल्या तालुक्याचा बॅनर लावण्यात यावा. सर्व समाज बांधवांनी आपापली वाहने पिंपरी चिंचवड व तेथून पुढे मुंबईच्या दिशेने घेऊन जाताना रहदारीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करायचे आहे. दुर्दैवाने एखाद्या वाहनास काही अडचण आल्यास तिथून जाणाऱ्या समाज बांधवांनी त्या वाहनातील अडचण दूर करणे कामी त्यांना मदत करावी अशी सूचना देण्यात आली आहे. पुणे जिल्हापर्यंत मोटरसायकल रॅलीने हजारोच्या संख्येने जायचे असल्याने सर्व महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच नवतरुण समाज बांधव तरुणांनी मोटर सायकल रॅलीच्या दृष्टीने नियोजन करावे असे आवाहन करण्यात आले आहे आहे. येणाऱ्या महिला समाज भागिनींना कुठलाही प्रकारची अडचण किंवा त्रास होणार नाही याची सर्व खबरदारी त्या-त्या विभागातील तालुक्यातील व शहरातील समाज बांधवांनी घ्यायची असल्याचेही आवाहन करण्यात आले आहे.



## अवयवदाननाची महती सांगणारा '८ दोन ७५' : फक्त इच्छाशक्ती हवी

### १९ जानेवारीला प्रदर्शित होणाऱ्या चित्रपटाचा ट्रेलर लाँच

**नाशिक । प्रतिनिधी**

अवयवदान हा अत्यंत गंभीर विषय अतिशय हलक्या फुलक्या पद्धतीनं '८ दोन ७५ : फक्त इच्छाशक्ती हवी'! या चित्रपटातून मांडण्यात आला आहे. चित्रपटसृष्टीत उत्सुकता निर्माण केलेला हा चित्रपट १९ जानेवारीला प्रदर्शित होणार असून, या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच लाँच करण्यात आला. ८ दोन ७५ म्हणजे नक्की काय? हे या चित्रपटाचा ट्रेलर पाहिल्यावर आपल्या लक्षात येईल. अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

उदाहरणार्थ निर्मित या निर्मिती संस्थेचे विकास हांडे, लोकेश मांगडे आणि सुधीर कोलते यांनी '८ दोन ७५ : फक्त इच्छाशक्ती हवी:! या चित्रपटाची निर्मिती केली आहे. तर सुश्रुत भागवत यांनी हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे. शर्वाणी - सुश्रुत यांनी चित्रपटाच्या पटकथा लेखनाची, तर संजय मोने यांनी संवाद लेखनाची जबाबदारी निभावली आहे. अभिनेता शुभंकर तावडे, अभिनेत्री संस्कृती बालगुडे यांच्यासह शर्वाणी पिल्लई, संजय मोने, आनंद इंगळे, राधिका हर्षे - विद्यासागर, अश्विनी कुलकर्णी, विजय पटवर्धन, चिन्मय संत, डॉ.निखिल राजेशिर्के, सीमा कुलकर्णी, पुष्कर श्रोत्री यांच्या चित्रपटात भूमिका आहेत. वैभव जोशी यांनी गीतलेखन, अवधूत गुप्ते यांनी संगीत दिग्दर्शन केलं आहे. अनेक चित्रपट महोत्सवांमध्ये ९० पेक्षाही अधिक पुरस्कार या चित्रपटानं मिळवले आहेत. उत्तम स्टारकास्ट असलेला, महत्त्वाचा विषय मनोरंजक पद्धतीनं मांडणारा '८ दोन ७५: फक्त इच्छाशक्ती हवी'! हा चित्रपट आता १९ जानेवारीला चित्रपटगृहात पाहता येईल.

## कलगिधर स्कूल मध्ये श्री गुरु गोबिंद सिंह महाराज यांची जयंती साजरी

**लासलगाव । वार्ताहर**

लासलगाव येथील कलगिधर इंग्लिश मिडियम स्कूल मध्ये श्री गुरु गोबिंद सिंह महाराज यांचा जन्म शताब्दी सोहळा आयोजित करण्यात आला होता या वेळी सरदार जगदेवसिंग भल्ला यांचे हस्ते 'श्री गोबिंद सिंह महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.येथील गुरुनानक गुरुद्वाराचे प्रबंधक यांनी पाठ पठण केला.




सरदार अमरसिंग गिल्ल यांनी उपस्थितांना श्री गुरु गोबिंदसिंह महाराज यांच्या जीवकार्याविषयी माहिती दिली.

गुरुनानक गुरुद्वाराचे प्रबंधक यांनी श्री गुरु गोबिंद सिंह यांचे महत्त्वाचे क्षण समाजकार्य, देशसेवा व शिक्षणाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक दीपक बाबरे शाळेतील शिक्षक व शिक्षेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

### दहिवाळ शिवारात बसची दुचाकीला धडक

**मालेगाव ।** चाळीसगाव रस्त्यावरील दहिवाळ शिवारात सोमवारी सकाळी बसने दुचाकीला धडक दिली. या अपघातात कळवाडी येथील जालम सैंदाणे व सिंधूबाई सैंदाणे हे दाम्पत्य जखमी झाले आहेत. चाळीसगावहून मालेगावकडे येणाऱ्या पंचवटी डेपोच्या बसने समोरुन येणाऱ्या दुचाकीला धडक दिली. सैंदाणे यांच्या फिर्यादीवरून मालेगाव तालुका पोलिस ठाण्यात बसचालक विलास मेहेरखांब यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## स्वामीनारायण नगर येथे कलश पूजन अन् अक्षता वाटप कार्यक्रम

### भाविकांचा उत्साह ; उमेश महाराज यांचे मार्गदर्शन

**नाशिक । प्रतिनिधी**

अयोध्येत बहुप्रतीक्षेत श्रीराम मंदिर उद्घाटन सोहळा काही दिवसांवर आला आहे. या पार्शवभूमीवर नाशिकसह देशभरात ठीक ठिकाणी विविध कार्यक्रम सुरू आहेत. पंचवटीतील आडगाव नाका,



स्वामीनारायण नगर येथे कलश पूजन अन् श्रीराम प्रतिमा व अक्षता वाटप करण्यात आले.

महाबली हनुमान मंदिर येथे झालेल्या कार्यक्रमास तपोवन येथील उमेश महाराज,आयोजक सोमनाथ बोडके,विशाल पवार, संजय घुगे, महेश कापडे, सागर भगत, गिरीश आहेर,भूषण दराडे,विवेक सिंग, संतोष कारसुळकर, भास्कर पाटील, राजगिर गोसावी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी उमेश महाराज यांनी मनोगतात श्रीराम मंदिर होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. या जागतिक पातळीवरील उत्सवात स्थानिक कार्यक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले. आयोजक सोमनाथ बोडके यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास विष्णू महाजन, जयवंत बागुल, भिमराव बोडके, चंद्रकांत रहाणे, दिलीप बडगुजर, वैभव गोसावी, वीणा दिवटे, भगवती कशियानी,मंजुषा कापडे, रत्ना बडगुजर, मंगल घुगे, तेजस्वीनी गोसावी, सरला बोडके, धर्मिष्टा टाक यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आकांक्षा महिला मंडळातर्फे संस्कार, संस्कृती दर्शन कार्यक्रम



**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक येथील इंदिरानगरस्थित लाड शाखीय वाणी समाजाच्या आकांक्षा महिला मंडळाने नववर्षाचे स्वागत करत सुदर्शन लॉन्सला संस्कार आणि संस्कृती दर्शन हा समाज प्रबोधनपर कार्यक्रम सुजाता कुडे यांच्या अध्यक्षतेखाली घेतला.

यावेळी हिरकणी पुरस्कृत युनिकच्या महिलाध्यक्षा अनिता सोनवणे, आयुर्वेदाचार्य-पंचकर्म विशारद डॉ.मोनाली राणे, अग्निहोत्र प्रसारक वंदना बिरारी, देवानंद बिरारी, सुधाकर बडगुजर, दिपाली कोतकर या मान्यवरांचे मार्गदर्शन लाभले. उपस्थितांच्या मनाला मोहिनी घालत सद्यस्थितीत चालू असलेल्या बिघडत चाललेल्या समाज व्यवस्थेवर अंजन घालत आपण संस्कार-संस्कृती जपत यज्ञातील समिधाप्रमाणे पुढील पिढीसाठी कार्य करावे सूत्रसंचालनातून संस्कार संचलन करण्याचे आवाहन केले. शैला आणि नीलम बधान यांनी सुमधुर आवाजात सर्वांचे स्वागत केले. दीप्ती वाणीच्या गणेश वंदना या कथ्थक नृत्याने स्पर्धात्मक कार्यक्रमाची सुरुवात झाली. तीन पिढ्यांचा संगम बघून कार्यक्रमाचे उद्दिष्ट सार्थ झाले असे मनोगत मंडळाच्या संस्थापिका अध्यक्षा आशा सोनजे, उपाध्यक्षा प्रभावती बाविस्कर यांनी व्यक्त केले. रेखा कोतकर यांनी आभार मानले.

## दसक -पंचक, जेलरोड परिसरात श्री रामचंद्र आनंदोत्सव सोहळा

**नाशिकरोड । प्रतिनिधी**

पंचक जेलरोड परिसरात दि.२१ ते २६ जानेवारी दरम्यान प्रभू श्रीराम उत्सव समिती, शिवराज्याभिषेक समिती दसक व टीम ध्येयपूर्ती नाशिक, शिवजन्मोत्सव सोहळा समिती, दसक-पंचक जेलरोड परिसरातील सर्व मित्र मंडळांच्या वतीने 'मर्यादा पुरुषोत्तम श्री रामचंद्र आनंदोत्सव सोहळा' आयोजित केला आहे.

श्रीरामचंद्र यांचा अयोध्या नगरीत श्रीराम मंदिर उत्सव दि. २२ जानेवारी रोजी साजरा होत आहे. अयोध्या नगरीत नवीन उभारण्यात आलेल्या भव्य मंदिरात त्यांच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठेचा सोहळा संपूर्ण भारत देशात साजरा होणार आहे. यानिमित्ताने दसक-पंचक जेलरोड परिसरात सुद्धा प्रभु श्रीराम उत्सव समिती व शिवराज्याभिषेक समिती दसक तसेच टीम ध्येयपूर्ती नाशिक आणि दसक-पंचक जेलरोड परिसरातील जय जनार्दन भक्त मंडळ, श्री स्वामी समर्थ भक्त मंडळ शिवजन्मोत्सव सोहळा



समिती दसक-पंचक जेलरोड, वंदे मातरम सोशल युवा मंच व अनेक मित्र मंडळांच्या सहकार्याने 'मर्यादा पुरुषोत्तम श्री रामचंद्र आनंदोत्सव' साजरा होणार आहे. दसक पंचक जेलरोड परिसरात अयोध्येतील श्री राम मंदिराचा भव्य असा देखावा साकारण्यात आला आहे. कै. सागर आप्पा आढाव चौक, इंदिरा गांधी पुतळ्याजवळ नारायण बापूनगर, दसक जेलरोड येथे समारंभ होणार आहे. यात प्रभु श्री रामचंद्रांच्या अयोध्येहून या परिसरात आगमन झालेल्या पादुकांचं सर्व परिसरातील श्रीराम प्रतिष्ठापना सोहळ्यासाठी मिळालेल्या अक्षता पादुकांवर समर्पित करण्यासाठी आणि पादुकांचे दर्शन घेण्यासाठी सर्व भाविकांनी यावे असे आवाहन करण्यात आले आहे.

याचबरोबर रविवार, दि. २१ जानेवारी रोजी संध्याकाळी ४ वाजता श्रीराम पालखी सोहळ्याला प्रारंभ होणार श्री हनुमान मंदिर दसक गाव इथून या पालखीचे संयोजन केले आहे. श्री जय जनार्दन भक्त मंडळ दसक-पंचक तसेच समस्त भजनी मंडळ आणि समस्त गावकरी मंडळ यांनीही या पालखी सोहळ्यासाठी सर्व गावकऱ्यांनी तसेच पंचक्रोशीतील सर्व रामभक्तांनी आपली उपस्थिती लावावी. या परमपावन अशा श्रीराम पालखी सोहळ्याचा आनंद घ्यावा, अशी विनंती आयोजकांतर्फे करण्यात आली आहे.

## वडापाव विक्रेत्याने रचले 'बन गया मंदिर राम का' गीत

### चित्रबद्ध केलेले गाणे व्हायरल! दीड लाखांहून अधिक व्ह्यू

**नाशिक । प्रतिनिधी**

अयोध्येत श्रीराम मंदिर पुजनाची तारीख जसजशी जवळ येत आहे, तसतशी उत्सुकता वाढीस लागत असून भक्तगणही तयारीला लागले आहेत. सिडको परिसरातील पवननगर भागामध्ये वडापावचा व्यवसाय करणाऱ्या कैलास सांबरे यांनी 'बन गया मंदिर राम का' हे गाणे लिहिले आणि मित्रांच्या सांगण्यावरून त्यांनी या गाण्याला संगीत देऊन मुलगा देव सांबरे याला घेऊन हे गाणे चित्रितही केले आहे. त्यांच्या या गाण्याची चांगलीच चर्चा रंगू लागली आहे.

यासंदर्भात त्यांनी सांगितले की, खरे तर वडापावचे काम करताना आपल्या गायनाची, लेखनाची आवड मागे पडली होती. परंतु अयोध्येतील राम मंदिर बांधून पूर्ण झाले. या आनंदाच्या भरात कैलास यांनी हे गीत लिहून त्याचे चित्रीकरण करून घेतले. या गीताला एक लाखांहून अधिक लोकांनी यूट्यूबवर पाहिले आहे. विशेष म्हणजे प्रचंड व्हायरल झालेले हे गीत सर्व लोकांच्या पसंतीस उतरत आहे.

## मोतीलाल ओसवाल होम फायनान्सच्या जाचाला कंटाळून जाधव परिवार सामुहिक आत्महत्या करणार!

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

कर्जदार आपले कर्ज फेडण्यासाठी तयार असताना देखील आर. बी आयचे सर्व नियम धाब्यावर बसवून मनमानी करणार्या तसेच कर्जदाराचे संपत्तीला बेकायदेशीरपणे सील लावणे, जप्ती करणे, त्यावर बंदी घालणेसारखे प्रयोग करीत परिवाराला मानसिक त्रास देणाऱ्या मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड च्या प्रवृत्तीवर आळा न घातल्यास परिवारासमोर सामूहिक आत्महत्या करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही असा इशारा त्रस्त कर्जदार श्रीमती शोभाबाई जाधव आणि प्रवीण जाधव यांनी पत्र परिषदेत दिला यावेळी आरपीआयचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत पाटोळे, राष्ट्रवादीचे भरत जाधव, किरण जाधव, रूपाली काटे, शुभम पाटील, महेश कांबळे, सार्थक लोहार, बजरंग वाकळे आदी उपस्थित होते. २०१६ साली ८ लाख ३८ हजार ०७८ रुपये कर्ज घेतल्यानंतर आत्तापर्यंत १६ लाखाहुन




अधिकच्या रक्कमेची परतफेड केल्यानंतरही उर्वरित काही रक्कम भरणे आम्हाला मान्य असून देखील त्या संदर्भात आमच्या संपत्तीला टाच येऊ नये म्हणून प्रयत्न केले असता मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड यांच्याकडून सातत्याने तगादा लावला जातो आहे. आमची संपत्ती जप्त करण्याची नोटीस देत धमक्या दिल्या जात आहेत तसेच अर्वाच्य शिवीगाळ करून मनमानी पद्धतीने कर्जाची वसुली केली जात आहे. फायनान्स कंपनीच्या या मानसिक जाचाला कंटाळलो आहोत. उर्वरित रक्कम भरणेसाठी थोडी मुदत द्यावी अशी मागणी केली असता आमची संपत्ती बेकायदेशीरपणे ताब्यात घेऊन तिची विल्हेवाट लावणेसाठी सदर फायनान्स कंपनीच्या वसुली अधिकाऱ्यांनी जबरदस्ती करून मानसिक संतुलन बिघडवले आहे. आम्हास बेघर करून रस्त्यावर आणण्यासाठी त्यांना घाई झाली आहे. हा प्रकार उघड होण्यापूर्वी मोतीलाल ओसवाल होम फायनान्स कंपनीने त्यांच्या कार्यालयासाठी माझ्याकडून घराची मागणी केली होती. त्या बदल्यात पैशाचा मोबदला देण्याची ऑफर केली होती. आम्ही त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. त्यांचे म्हणणे टाळले या कारणाचा राग धरून मा. न्यायालयीन सुव्यवस्थेची दिशाभूल करून घर जप्त करण्याचे आदेश काढले गेले आहेत. बँकेकडून होणारी सर्व प्रक्रिया ही बेकायदेशीर असल्याचे प्रवीण जाधव यांनी स्पष्ट केले. अनेकांची फसवणूक करणार्या फायनान्स कंपनीच्या विरोधात तिव्र आंदोलन करण्यात येणार असल्याचे रिपाईचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत पाटोळे यांनी स्पष्ट केले.

**ॲड. एम. व्ही. घरटे**
**निशाणी क्र.-६**

**जाहीर नोटीस**

**धुळे येथिल मे.२ रे सह दिवाणी न्यायाधिश सो., (व.स्त.) यांचे कोर्टात**

**दि.कि. अर्ज नं. ७१ / २०२४**

१.श्री. भगवान दगा पाटील, उ.व.-६४, धंदा-शेती,
रा. मौजे शिरधाणे प्र. डांगरी, ता. जि. धुळे.
२. श्री. सीताराम भगवान पाटील, उ.व.-३७, धंदा-शेती,
रा. मौजे शिरधाणे प्र. डांगरी, ता. जि. धुळे.
३. श्री. जितेंद्र भगवान पाटील, उ.व.-३०, धंदा-शेती,
रा. मौजे शिरधाणे प्र. डांगरी, ता. जि. धुळे. .....**अर्जदार**
|| विरुध्द ||
कै. हिरकनबाई भगवान पाटील मृत्यु दिनांक : ०८/०८/२०२३
मयताचा पत्ता-मौजे शिरधाणे प्र. डांगरी, ता. जि. धुळे. ....**सामनेवाला**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की,

अर्जदार क्र. १ ते ३ यांनी ते मयत कै. हिरकनबाई भगवान पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवुन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जाकामी कोणाचीही काही एक हरकत असल्यास त्यांनी दिनांक : २१.०२.२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता आपण स्वत: अथवा आपल्या वकीलांमार्फेत हजर राहुन लेखी हरकत नोंदवावी.

३. उक्त दिवशी व वेळी कोणी हजर न झाल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजुन पुढील आदेश पारीत करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काही एक तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस न्यायालयाचे शिक्यानिशी व माझे सहीनिशी आज दि.१६/०१/२०२४ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दिनांक : १६/०१/२०२४ आदेशावरुन

शिक्का

**कामगिरी कारकुन** **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय (व .स्त) धुळे.** **दिवाणी न्यायालय (व .स्त) धुळे.**

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक
गुरुवार दि. १८ जानेवारी २०२४





# साक्री तालुक्यातील विकसित भारत संकल्प यात्रा संपन्न

## ग्रामस्थांना विविध योजनांची माहिती देऊन केली जनजागृती
























धुळे
। पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून विकसित भारत संकल्प यात्रेचे देशभरात आयोजन करण्यात येत आहे. या पार्श्र्वभूमीवर आज विकसित भारत संकल्प यात्रा साक्री तालुक्यातील ग्रामपंचायत मल्याचापाडा,मळगाव प्र.वार्सा,काळंबा व पानखेडा येथे उत्साहात संपन्न झाली. विकसित भारत संकल्प यात्रेद्वारे केंद्र शासनाच्या योजना नागरिकांच्या दारापर्यंत पोहचविण्यात येत आहेत. धुळे जिल्ह्यात २९ नोव्हेंबर,२०२३ पासून सुरु झालेली ही यात्रा ८ जानेवारी,२०२४ पर्यंत धुळे-८२, साक्री-१५५, शिरपूर-८३ व शिंदखेडा-८३ अशा ४०३ ग्रामपंचायतीत पोहचली असून ४ लाख ५३ हजार ४९४ नागरिकांनी या यात्रेला आतापर्यंत भेट दिली आहे. या यात्रेत ग्रामीण भागात आयुष्मान भारत, प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान, प्रधानमंत्री आवास योजना, उज्वला योजना, पीएम विश्र्वकर्मा योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान योजना, किसान क्रेडीट कार्ड, प्रधानमंत्री पोषण अभियान, हर घर जल-जलजीवन मिशन, जन धन योजना, जीवन ज्योती विमा योजना, सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना, नमो फर्टीलायझर या योजनांबाबत माहिती देण्यासोबत नागरिकांची आरोग्य तपासणीदेखील करण्यात येत आहे.

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक





# नाशिक लोकसभेच्या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा देखील दावा

## महायुतीत चर्चेनंतर लवकरच निर्णय होईल : मंत्री छगन भुजबळ



















नाशिक । नाशिक

जिल्ह्यात सर्वाधिक आमदार हे अजितदादा पवार गटाचे आहे. त्यामुळे नाशिकमध्ये लोकसभा निवडणुकीसाठी आपलाही दावा कायम आहे. वरिष्ठ पातळीवर चर्चेनंतर कोण उमेदवार असेल ते ठरविले जाईल. कुठली जागा कुणाला मिळेल ते लवकरच कळेल पण महायुतीतील कुठल्याही पक्षाला संधी मिळाली. त्या उमेदवाराच्या पाठीशी उभे राहावे. आगामी वर्ष हे निवडणुकांचे असून त्यादृष्टीने पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे असे आवाहन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले. मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत काल राष्ट्रवादी भवन येथे आढावा बैठक पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आ. दिलीप बनकर, जिल्हाध्यक्ष ड.रवींद्र पगार, शहराध्यक्ष रंजन ठाकरे, जिल्हाध्यक्ष विष्णुपंत म्हैसधुणे, कार्याध्यक्ष गोरख बोडके, प्रदेश पदाधिकारी नानासाहेब महाले, माजी आमदार शिवराम झोले, अर्जुन टिळे, निवृत्ती अरिंगळे, महिला निरीक्षक शोभा पगारे, महिला शहराध्यक्ष योगिता आहेर, महिला जिल्हाध्यक्षा प्रेरणा बलकवडे, युवक शहराध्यक्ष अंबादास खैरे, उत्तर महाराष्ट्र युवक अध्यक्ष गौरव गोवर्धने, युवक जिल्हाध्यक्ष योगेश निसाळ, चेतन कासव, महिला पदाधिकारी कविता कर्डक, मेघा दराडे, समिना मेमन, युवती जिल्हाध्यक्ष किशोरी खैरनार, डॉ.योगेश गोसावी, प्रा.ज्ञानेश्वर दराडे, मनीष रावल, राजेंद्र डोखळे, आकाश कदम, नितीन चंद्रमोरे, संजय खैरनार, यशवंत शिरसाठ, अजय खांडबहाले यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.